MHBI100012562025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २९५/२०२५**
**भिमराज रमेश गायकवाड वि. निरंक**

## निशाणी क्र.१ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणुक करण्यासंबंधी तरतुद करण्याबाबत विनिमय (बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७) मधील कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता  दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, मयत केशरबाई रमेश गायकवाड ह्या दिनांक २०.०७.२०२३ रोजी वाय.सी.एम. रूग्णालय पिंपरी (चिंचवड) जि.पुणे येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार यांनी अर्जात असे नमूद केले आहे की, मयत केशरबाई रमेश गायकवाड यांचा अर्जदार क्र. १ हा मुलगा व अर्जदार क्र.२ ते ४ हया मुली आहेत. मयत केशरबाई रमेश गायकवाड यांच्या पश्चात्त अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. १ चे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी क्र.३१) येथे दिलेले आहे. सोबत अर्जदाराने मयत केशरबाई रमेश

गायकवाड यांचे मुळ मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र. ५), ग्रामपंचायत कार्यालय आडस यांचे वारसाचे प्रमाणपत्र (निशाणी क्र.६), ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय आडस यांनी दिलेली पी.टी.आर नक्कल (निशाणी क्र.२३) व मयत केशरबाई रमेश गायकवाड व अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डच्या सत्यापित प्रती (निशाणी क्र. ७ ते ११) दाखल केलेले आहे.

४. अर्जदार यांनी अर्जामध्ये मयत केशरबाई यांचा मृत्यु मौजे आडस ता.केज येथे झाल्याचे नमुद केले होते व त्याप्रमाणे जाहिरप्रगटन दिनांक १९.०७.२०२५ रोजीच्या "दैनिक संकेत" या वृत्तपत्रामध्ये करण्यात आले होते. त्यानंतर अर्जामध्ये दुरुस्ती करुन अर्जदार हे पिंपरी चिंचवड जि.पुणे येथे मयत झाल्याची दुरुस्ती करुन त्याबाबतचे प्रगटन दिनांक १९.१२.२०२५ रोजीच्या ''संकेत'' वृतपत्रामध्ये अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकूराची जाहीर प्रसिध्दी केली गेली व त्याची प्रत निशाणी क्र. २९ वर दाखल केली आहे. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र.१ ने निशाणी क्र. ३१ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले. त्याची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधीत आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमूद कथनांस मिळते जुळते आहे. अर्जदाराचा अर्जदाराने नि.क्र.२३ येथे दाखल केलेल्या

पी.टी.आर.क्र.६१/१ वरुन मयत केशरबाई या आडस येथील रहिवाशी होत्या तसेच अर्जदाराचा पुरावा असे दर्शवितो की, मयत केशरबाई या दि.२०.०७.२०२३ रोजी वाय.सी.एम. रूग्णालय पिंपरी (चिंचवड) जि.पुणे येथे मयत झाल्या असून अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आई आहेत.

५. वारस प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीबाबत मयत व्यक्तिचे अथवा तिच्या वारसांचे मालकी हक्क ठरविण्यासाठी प्रदान केले जात नसून, केवळ एखादी व्यक्ती ही मयत व्यक्तिची वारस आहे किंवा नाही हे ठरविण्यापर्यंतच मर्यादीत आहे. अर्जातील कथन तोंडी व कागदोपत्री पुरावा इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत केशरबाई रमेश गायकवाड यांना त्यांच्या पश्चात्त कायदेशीर वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत म्हणून सदर पुरावा ग्राहय धरणे योग्य होईल. सबब, असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार हेच मयताचे ''वारसाचे प्रमाणपत्र'' मिळविण्यास पात्र आहेत, करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ भिमराज पि. रमेश गायकवाड, २. दिपाली भ्र. मारूती शिरसाठ, ३. त्रिशाला भ्र. संतोष ठोकळे व ४. रत्नमाला भ्र. सिध्दार्थ पटेकर हे मयत केशरबाई रमेश गायकवाड यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

३. सदर वारस प्रमाणपत्र मयताचे नावावर असलेली कोणतीही रक्कम उचलणेकामी वापरणे येवु नये.

४. अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.04.16 16:25:40 +0530

केज. **(पी.व्ही.चव्हाण)**
दि. १६.०४.२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 16.04.2026 |
| Transcribed on | : | --- |
| Checked & signed on | : | 16.04.2026 |

Sd/-

(M.A.Kulkarni),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.